महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, सर्व्हे नं.१५६०/१
आडगांव शिवार,आडगांव नाशिक–४२२००३
Website-sscboardnashik.com

Maharashtra State
Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board, Serve No.1560/1
Adgaon Shivar, Adgaon, Nashik-422003.
Email-nsksec@rediffmail.com

तातडीचे / परीक्षाप्राधान्य

क्रमांक / ना.वि.मं / उ.मा अ–३ / माध्य ब–३ / खा.वि / 1540
नाशिक: ४२२००३
दिनांक:– 27/०८/२०२४

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
(नाशिक, धुळे, जळगांव व नंदुरबार)

विषय :– खाजगी विद्यार्थी फॉर्म नं. १७ बाबतच्या ऑनलाईन पध्दतीने नाव नोंदणी अर्जाबाबत.....

संदर्भ:– संदर्भ:– १) या कार्यालयाचे क्र.नाविमं / उमा अ–३ / १४०९ दि.१३ / ०८ / २०२४ रोजीचे प्रकटन.....
२) या कार्यालयाचे क्र.नाविमं / माध्य ब–३ / १४०९ दि.२१ / ०८ / २०२४ रोजीचे प्रकटन.....

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेस खाजगीरीत्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणी अर्जाच्या तारखा दि.१३ / ०८ / २०२४ ते दि.३० / १० / २०२४ अशा आहेत.

मंडळाने खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) भरण्याबाबतची सर्व प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने केलेली आहे, तथापि मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की, विद्यार्थ्यांने नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) भरल्यावर सदरचा फॉर्म हा आपल्या स्तरावर प्रलंबित **(Pending)** आहे. जो पर्यंत आपण सदरच्या फॉर्मची मूळ दस्ताऐवजासह छाननी / पडताळणी करून मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याची कार्यवाही करत नाही तो पर्यंत सदचा फॉर्म हा मंडळाच्या लॉगिनवर दिसत नाही. यामुळे मंडळास सदरच्या फॉर्मवर पुढिल कार्यवाही करता येत नाही. तेव्हा आपणास सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांने नाव नोदणी अर्ज (फॉर्म नं. १७) भरण्याबाबतची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन करून सदचा फॉर्म आपल्या स्तरावर प्रलंबित **(Pending)** राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी. विद्यार्थ्यांने फार्म नं.१७ ची ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण केल्यास खालील प्रमाणे फॉर्म नं.१७ बाबत कार्यवाही करण्यात यावी.

१. फॉर्म नं.१७ बाबतचे संकेतस्थळ **http://www.mahahsscboard.in**
२. सदर संकेतस्थळावर जाऊन विद्यार्थी हे विद्यार्थी लॉगिन **(Student login)** वरून फॉर्म भरतील. विद्यार्थी फॉर्म भरतांना फॉर्म नंबर **Form -17 (HSC) Form -17 (SSC)** हे निवडेल त्यावर क्लिक केल्यास

**Form 17 SSC** **Form 17 HSC**

हे दिसेल पाहिजे त्यावर क्लिक केल्यास फॉर्म केल्यास फॉर्म नं.१७ ओपन होईल.

**Form 17s Student Applocation Login**

**Email ID-**

Enter Email ID

**MOBILE NO-**

Enter Mobile Number

टाकल्यावर त्याचा **OTP** येईल ई–मेल **OTP** चा आल्यावर तो त्याच्या समोर नमूद करावयाचा आहे.

☐ **I have read the terms and conditions below and I agree to them Download**

या खालील सर्व सूचना वाचून बॉक्स मध्ये क्लिक करावे म्हणजे **Application Form** ओपन होईल, **Application Form** मधील सर्व माहिती भरून झाल्यावर फोटो, सही व सर्व मूळ कागदपत्रे व आवश्यक कागदपत्रे **Download** करून भरावीत व **Save** करून ठेवावे. मग फी चार्ट येईल, फी भरल्यावर **Save** व **Ok** करून फॉर्म शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडे ऑनलाईन वर्ग होईल. विद्यार्थ्यांनी फॉर्मची प्रिंट व सर्व मूळ कागदपत्रे घेवून शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडे जमा करावयाची आहे.

३. शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या लॉगिंग वरून फॉर्म नं.१७ ची तपासणी ऑनलाईन **Download** केलेली सर्व कागदपत्रे व त्या संदर्भातील सर्व कागदपत्रांची पूर्तता झाली असल्याची खात्री करूनच **Send to Board** करावे. जो पर्यंत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे मार्फत ऑनलाईन अर्ज मंडळाकडे पाठविला जात नाही तो पर्यंत सदचे अर्ज आपल्यास्तरावर प्रलंबित **(Pending)** राहतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

विद्यार्थ्याने भरलेल्या अर्जाची प्रिंट आऊट व मूळ कागदपत्रे आपल्याकडे ठेवातील मूळ कागदपत्रे व अर्ज मंडळाकडे जमा करू नये, याबाबत प्रामुख्याने आपणांस सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांना, पालकांना अथवा शाळा प्रतिनिधींना याबाबत मंडळाकडे पाठवू नये, फॉर्म नंबर १७ बाबतची सर्व प्रक्रिया ही ऑनलाईन होणार असल्याने त्रुटी, पात्र, अपात्र हे विद्यार्थ्यांना आपणांस एस. एम.एस, ई–मेल व्दारे कळविले जाणार आहे. सर्व त्रुटींची पूर्तता ही ऑनलाईन पध्दतीनेच करावयाची आहे.

पात्र विद्यार्थ्यांना **Enrollment Certificate** ऑनलाईन त्यांच्या मोबाईलवर ई–मेल, एस.एम. एस व्दारे कळविण्यात येणार आहे. त्यांनी ते **Download** करून शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन परीक्षा फॉर्म भरावयाचा आहे.

विद्यार्थ्यास **Enrollment Certificate** मिळाल्यानंतर परीक्षा आवेदनपत्र भरून घेण्याची जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी. विद्यार्थी बहिस्थ असल्याने त्याची प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी परीक्षा घेण्याबाबत विद्यार्थ्याच्या संपर्कात राहून कार्यवाही करावी.

विद्यार्थी आपणाकडे फॉर्म नं.१७ जमा करण्यासाठी आल्यावर सदर अर्ज नाकारण्यात येवू नये तसे आढळून आल्यास मंडळ नियमावलीनुसार कारवाई करण्यात येईल, तसेच परीक्षेचे आवेदनपत्र भरून घेण्यास नकार दिल्यास सदर शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक गोठविण्यात येईल याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी.

*टिप:– दि.१३/०८/२०२४ रोजी पासून खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज भरणेसाठी ऑनलाईन प्रक्रिया सुरू झालेली असून अद्यापपावेतो एकही नावनोंदणी अर्ज मंडळाच्या **Dash Board** वर पुढिल कार्यवाहीसाठी उपलब्ध झालेला नाही तरी त्वरीत नावनोंदणी अर्जाची पडताळणी/छाननी करून परीपूर्ण अर्ज हे **Send to Board** या टॅब वर जावून मंडळाकडे पाठविण्याची कार्यवाही करावी अन्यथा होणाऱ्या विलंबास आपण स्वत: जबाबदार राहाल.*

(एम.एस.देसले)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक–४२२००३

प्रत माहितीस्तव:---

१. मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्यमंडळ, पुणे–०४.
२. मा.शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
३. शिक्षणाधिकारी (माध्य), नाशिक , धुळे , जळगांव व नंदुरबार

D:\MAZA RAJU\PRIVATE CANDIDATE